संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# बँका बचतीसाठी की लुटारूंसाठी

**केंद्रातल्या** मोदी सरकार काळात भ्रष्टाचार रोखला गेला. कारभार किंवा प्रशासन गतीमान झाले अशा कितीही वल्गना केल्या जात असल्या तरीही वस्तुस्थिती तशी नाही. हे केंद्र सरकारच्याच विविध खात्यांच्या आकडेवारीवरून दिसून येते. म्हणजे काही दिवसापूर्वी केंद्र सरकारच्याच सांख्यिकी आयोगाने आपला अहवाल प्रकाशित करून गेल्या पंचेचाळीस वर्षातला बेरोजगारीचा उच्चांक कसा प्रस्थापित झाला आहे हे आकडेवारीनिशी दाखवून दिले. तर रिझर्व्ह बँकेने माहिती अधिकाराच्या अंतर्गत दिलेल्या एका आकडेवारीतून सर्वांनाच आश्चर्यचकित केले आहे. केवळ २०१८ आणि १९ या आर्थिक वर्षात सरकारी बँकेला आणि काही निवडक संस्थांमध्ये तब्बल ७१ हजार ५०० कोटीचे घोटाळे झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. रिझर्व्ह बँकेने असे म्हटले आहे की या काळामध्ये बँक घोटाळ्यांच्या ६ हजार ८०० प्रकरणांची नोंद झाली. म्हणजे एकीकडे कोणताच भ्रष्टाचार नाही किंवा आर्थिक घोटाळे नाहीत. असे चित्र निर्माण केले जात असताना बँकांमधल्या या लुटारूपणावर केंद्र सरकार कोणताही अंकुश आणू शकलेले नाही. काही हजार प्रकरणांची संख्या आणि एकाच वर्षात ७१ हजार कोटी रुपयांना चुना लावण्याचा हा प्रकार पाहिल्यानंतर या पैसे वाचवणाऱ्या बँका आहेत की लूट करू देण्यासाठी उघडलेल्या सरकारमान्य संस्था आहेत असा गंभीर प्रश्न निर्माण होतो. भलेही एखादा मोठा घोटाळा झाला नसला या छोट्या मोठ्या गैरव्यवहारांमध्ये जर सार्वजनिक पैशाची अशी विल्हेवाट लावली गेली असेल तर याचीसुध्दा तितक्याच गांभिर्याने चौकशी झाली पाहिजे. एकट्या नीरव मोदीने पंजाब नॅशनल बँकेला चौदा हजार कोटीला धुवून काढले. तर विजय मल्ल्याने ९ हजार कोटीचा पोबारा करून इंग्लंडमध्ये पळून जाण्यात यश मिळवले. त्या दोन्ही प्रकरणांचा तपास जरी सुरू असला तरी सार्वजनिक पैशाची झालेली ही लूट कशी भरून काढणार हा प्रश्न अनुत्तरितच राहातो. सर्व प्रकारची दक्षता घेऊनही असे प्रकार जेव्हा होतात त्यावेळी एकतर त्याला राजकीय हितसंबंध कारणीभूत असले पाहिजेत किंवा बँक अधिकारी आणि संबंधित व्यक्ती या दोघांच्या संगनमताने हे घोटाळे केले जात असले पाहिजेत.

## राजकीय दबाव आणि हितसंबंध

रिझर्व्ह बँकेसारख्या मध्यवर्ती संस्थेचे नियंत्रण असताना आणि बँकांमधला हा पैसा अधिकाधिक सुरक्षित राहावा यापेक्षा निर्दोष बँक पध्दतीचा आग्रह धरला जात असताना इतक्या मोठ्या प्रमाणावर बँक घोटाळे व्हावेत. ही गोष्ट सहजासहजी दुर्लक्ष करण्यासारखी नाही. याच पध्दतीने गेल्या दहा वर्षात झालेल्या छोट्या मोठ्या घोटाळ्यांची रक्कम दोन लाख कोटीपर्यंत गेल्याचेही रिझर्व्ह बँकेने मान्य केले आहे. एकीकडे कर्ज बुडवणाऱ्यांची संख्या सतत वाढत गेली आणि आतापर्यंत याच सार्वजनिक बँकांमध्ये साडेचार लाख कोटी रुपये मोजक्या अशा पंधरा ते वीस बड्या उद्योगपतींनी बुडवल्याचे स्पष्ट झाले. म्हणजे ते साडेचार लाख कोटी आणि हे दोन लाख कोटी अशी ही साडेसहा लाख कोटींची रक्कम काही ठराविक लोकांनी आपल्या तिजोऱ्या भरण्यासाठी वापरून घेतली. बँक अधिकाऱ्यांना तर त्यांनी मॅनेज केलेच शिवाय राजकारण्यांना हाताशी धरून आपल्या कर्जाची वसुली होणार नाही अशी व्यवस्थाही करून घेतली. अन्यथा बुडित कर्जाची रक्कम तितकी फुगली नसती. एकतर कर्जे मंजूर करताना बँकांवर दबाव आणले जातात. कर्ज फेडण्याची क्षमता नाही अशी शिफारस बँक अधिकाऱ्यांकडून केली जात असतानाही कर्ज देण्याचा तगादा लावला जातो आणि आता जेव्हा ही रक्कम वसुल होण्याची शक्यता वाटत नाही. त्यावेळी ती रक्कम बुडित कर्जामध्ये टाकून बँक अधिकारी हात वर करून मोकळे होतात. घोटाळे आणि कर्जबुडवेपणा अशा भयंकर चक्रव्यूहात देशातल्या प्रमुख बँका अडकलेल्या आहेत. अशा परिस्थितीत देशाची आर्थिक व्यवस्था खूप सुदृढ आहे असे म्हणणे अत्यंत धाडसाचे ठरते. केंद्र सरकारने शून्य बँक घोटाळा किंवा शंभर टक्के कर्जवसुली अशी परिस्थिती निर्माण करून दाखवावी तरच हे सरकार भ्रष्टाचार विरोधात काम करते. यावर लोकांचा विश्वास बसेल. या परिस्थितीनेच सर्वच सार्वजनिक बँकांचा आर्थिक डोलारा कोसळला. आणि मग केंद्र सरकारला दोन लाख कोटींचे पॅकेज या बँकांच्या मदतीसाठी द्यावे लागले. जणुकाही ७१ हजार कोटींच्या घोटाळ्याबद्दलची खास बक्षिस सरकारने त्यांना दिली असावी, असेच म्हणावेसे वाटते.

## रिझर्व्ह बँकेचा धाक नाही

भारत हा विकसनशील देश आहे. शिवाय सर्वाधिक लोकसंख्या असलेला जगातला तितकाच मोठा देश मानला जातो. या देशाला आपल्या विकासाची गती वाढवायची असेल तर सर्वप्रथम आर्थिक व्यवस्था भक्कम करावी लागेल. आणि या अर्थव्यवस्थेच्या भक्कमपणासाठी देशातील सार्वजनिक बँका कार्यक्षम आणि घोटाळेमुक्त कराव्या लागतील. रिझर्व्ह बँकेने माहिती अधिकारामध्ये ही नवी आकडेवारी देऊन लोकांचे प्रबोधन केले आहे असे समजू नये. ही आकडेवारी म्हणजे रिझर्व्ह बँकेच्या नियोजनशून्यतेचे धिंडवडे आहेत. हे आपोआप सिध्द होते. इतक्या उघडपणाने हजारोकोटींचे घोटाळे होतात आणि रिझर्व्ह बँक त्यांच्या नियंत्रण आणू शकत नसेल तर या मध्यवर्ती आर्थिक संस्थेचा देशातील आर्थिक संस्थांवर कोणताही धाक नाही हे सिध्द होते. आणि याची नैतिक जबाबदारी रिझर्व्ह बँकेने स्वीकारली पाहिजे. केवळ घोटाळ्यांची माहिती देऊन आपली जबाबदारी बँकेला झटकता येणार नाही हे घोटाळे रोखण्यासाठी काय उपाययोजना केल्या जात आहेत किंवा घोटाळेबाज लोकांपैकी किती लोकांवर कारवाई झाली याचीसुध्दा माहिती रिझर्व्ह बँकेने दिली पाहिजे. अन्यथा घोटाळे होतच राहातील आणि केवळ त्याची माहिती संकलित करणारी संस्था म्हणून रिझर्व्ह बँकेला काम करीत राहावे लागेल.